| | |
|---|---|
| MHSN110001222011 | नियमित दिवाणी दावा क्र.२८/२०११<br>सचिन साळुंखे / निवृत्ती साळुंखे |

## निशाणी १२४, १२५, १२६ खालील आदेश

प्रस्तुतचे अर्ज हे वादी यांच्यामार्फत यातील प्रतिवादी क्र.५ हे दिनांक ०६/०४/२०२२ रोजी मयत झाल्याने त्यांच्याबाबत दावा अवसान पावल्याने तसे रद्दबातल करुन विलंब माफ करुन दाव्याच्या कामी मयत प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी समाविष्ट करुन घेण्यासाठी दाखल केले आहेत. वादी यांनी पुढे असे नमूद केले की, ते शेतकरी कुटुंबातील असून त्यांना मयत प्रतिवादी यांचा मृत्यूचा दाखला वेळेत घेता आला नाही. त्यामुळे, ते मुदतीत वारस रेकॉर्डवर घेवू शकले नाहीत. सबब, वारस मुदतीत रेकॉर्डवर घेण्यास विलंब झालेला आहे. अर्ज मंजूर न झाल्यास वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी अर्ज मंजूर करण्यात यावेत अशी प्रार्थना त्यांनी केली.

२. अर्जदार यांनी विलंब माफ होण्यासाठी निशाणी १२५ वर अर्ज दिला आहे. त्यातील मजकूर देखील प्रस्तुत अर्जाप्रमाणे आहे. तसेच त्यांनी निशाणी १२६ येथे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यात समाविष्ट करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जांवर प्रतिवादी यांनी म्हणणे देवून संपूर्ण अर्जांचे खंडण केलेले आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, अर्ज मान्य व कबूल नाही. अर्ज खोटा व लबाडीचा आहे. अर्जासोबत कोणताही पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करावेत.

३.        प्रस्तुतचा दावा हा वाटप व ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दाव्यात सर्व पक्षकारांचा समावेश करणे आवश्यक असते. त्यामुळे, वादी यांच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्याच्या कामी योग्य पक्षकार म्हणून समावेश करणे मला आवश्यक वाटते. परंतु झालेल्या विलंबाबाबत वादी यांच्यावर काही प्रमाणात दंड आकारणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचे अर्ज दंड म्हणून रक्कम रु.४००/– (अक्षरी चारशे रुपये मात्र) न्यायालयात भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र.५ यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना दाव्याच्या कामी समाविष्ट करुन घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दाव्याचे झालेले अवसान रद्दबातल करुन सदर कायदेशीर प्रतिनिधी यांना दाव्याचे कामी समाविष्ट करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते.

३. वादीने तशी दुरुस्ती करावी व दुरुस्त दावा प्रत द्यावी.

४. प्रतिवादी क्र.५ यांचे कायदेशीर वारसांना दाव्याचे समन्स पाठविण्यात यावे.

५. सहा. अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये सदर दुरुस्तीची नोंद करुन घ्यावी.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.06.27 16:25:15 +0530

आटपाडी.                                   (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : २७/०६/२०२४                 दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 27/06/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 27/06/2024 |
| Order uploaded on | : | 27/06/2024 |